# वसई-विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय विरार (पू), जि. पालघर, पिन नं-४०१३०५
दुरध्वनी-०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स-०२५०-२५२५१०७
ई मेल :-vasaivirarcorporation@yahoo.com

---

प्रशासकीय ठराव क्र. 2329 | विभाग:-नगररचना विभाग
दिनांक:- 20/02/2024

---

प्रस्तावाचा विषय:- **वसई विरार उपप्रदेशाच्या मंजूर विकास आराखडयामधिल मौजे-निळेमोरे येथील स.नं-१६२, स.नं.-१६३ हि.नं.-१/अ/१, १/ब/१ व १/क/१, स.नं.-१६४ हि.नं.-४, ७ जागेमधील प्रस्तावित होल्डींग पाँड च्या आरक्षणा मध्ये बदल करून सदर जागेवर मलनिस्सारण केंद्र STP (Sewage Treatment Plant) आरक्षण क्र.३५९A असे प्रस्तावित करणेकामी महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ चे कलम ३७ (१) अन्वये फेरबदल प्रस्ताव.**

प्रस्तावाचा मजकुर:- वसई-विरार उपप्रदेशाची विकास नियंत्रण नियमावली-२००१ राज्य शासनाने नगरविकास विभाग अधिसूचना टिपीएस/१२०/१८१३/सीआर-४८/२००२/नवि-१२ दि.१६/०२/२००४ अन्वये एम-१ ते एम-१४ या बदलासहित तसेच ईपी-१ ते ईपी-७ यामधील नियम वगळुन मंजूर केलेली असून ती दि.०१/०३/२००४ पासून अंमलात आलेली आहे. राज्य शासनाने त्यानंतर नगरविकास विभाग अधिसूचना क्र.टिपीएस/१२०/१८१३/सीआर-४८/२००२/नवी-१२, दि.३०/११/२००५ अन्वये ईपी-१ ते ईपी-७ यामधील वगळलेले नियम मंजूर केले असून ते दि.१८/०१/२००६ पासून अंमलात आलेले आहेत.

वसई विरार उपप्रदेशाची शहर विकास योजना (आराखडा) शासन निर्णय क्र. टि.पी.एस.१२०१/१५४८/सी.आर-२३४ (सी) दि.०९/०२/२००७ अन्वये भागश: मंजुर केली असून ती दि.१५/०३/२००७, पासून अमलात आलेली आहे. (११३ ई.पी. वगळुन त्यापैकी ३५ ई.पी. शासनाने नंतर मंजुर केलेल्या आहेत.) तयेच वसई-विरार उपप्रदेशातील एकुण क्षेत्रापैकी ४ तत्कालीन नगरपालिका (वसई, नवघर-माणिकपूर, नालासोपारा व विरार) व ५३ गावांसह शासन निर्णय नगरविकास विभाग क्र.२३०६/४१२/प्र.क्र./२२३/२००६/युडी-२४ दि.०३/०७/२००९ अन्वये वसई-विरार शहर महानगरपालिका अस्तित्वात आलेली असून नगरविकास विभाग निर्णस क्र. टि.पी.एस.१२०९/२४२९/सी.आर-२६२/युडी-१२ दि.०७/०७/२०१० नुसार या महानगरपालिकेला महानगरपालिका क्षेत्रासाठी नियोजन प्राधिकरण म्हणून अधिकार प्रदान केलेले आहेत. तेव्हा पासून वसई-विरार शहर महानगरपालिका क्षेत्रासाठी नियोजन प्राधिकरण म्हणून अधिकार प्रदान केलेले आहेत. तेव्हा पासून वसई विरार शहर महानगरपालिका क्षेत्रासाठी नियोजन प्राधिकरण म्हणुन वसई-विरार शहर महानगरपालिका कार्यरत असून त्याप्रमाणे कामकाज करीत आहे.

तसेच वसई विरार उपप्रदेशाच्या मंजूर विकास आराखडयामधिल मौजे-निळेमोरे येथील स.नं-१६२, स.नं.-१६३ हि.नं.-१/अ/१, १/ब/१ व १/क/१, स.नं.-१६४ हि.नं.-४, ७ जागेमधील प्रस्तावित होल्डींग पाँड च्या आरक्षणा मध्ये बदल करुन सदर जागेवर मलनिस्सारण केंद्र STP (Sewage Treatment Plant) प्रस्तावित करणेकामी महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ चे कलम ३७ (१) अन्वये फेरबदल प्रस्ताव करणे करीता पाणिपुरवठा विभाग यांनी मागणी केली होती. व त्या बाबत खालील प्रमाणे अहवाल सादर केला आहे.

तसेच वसई विरार उपप्रदेशाच्या मंजूर विकास आराखडयामधिल मौजे-निळेमोरे येथील स.नं-१६२, स.नं.-१६३ हि.नं.-१/अ/१, १/ब/१ व १/क/१, स.नं.-१६४ हि.नं.-४, ७ जागेमधील प्रस्तावित होल्डींग पाँड च्या आरक्षणा मध्ये बदल करुन सदर जागेवर मलनिस्सारण केंद्र STP (Sewage Treatment Plant) प्रस्तावित करणेकामी महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ चे कलम ३७ (१) अन्वये फेरबदल

प्रस्ताव करणे करीता पाणिपुरवठा विभाग यांनी मागणी केली होती. व त्या बाबत खालील प्रमाणे अहवाल सादर केला आहे.

वसई-विरार शहर उपप्रदेशाच्या विकास आराखडयास शासनाने सन २००७ मध्ये मान्यता दिली आहे. विकास आराखडयात प्रमुख नागरी भागात मलनि:स्सारण केंद्रासाठी ७ आरक्षणे ठेवली आहेत. सॅटेलाईट सिटी योजनेअंतर्गत उपलब्ध अनुदानातून झोन -१ व झोन-२ मिळून विरार पश्चिम, बोळींज येथे ३० द.ल.ली. क्षमतेची मलनि:स्सारण प्रकल्प (STP Zone-२) कार्यान्वित करणेत आला आहे.

वसई - विरार शहर महानगरपालिका क्षेत्राची सन २०११ च्या जनगणनेनुसार १२.३४ लक्ष व सद्याची अंदाजे २५ लक्ष इतकी लोकसंख्या झाली आहे. वसई विरार उपप्रदेशाच्या मंजूर विकास आराखडयास शासनाने सन २००७ मध्ये मान्यता दिली असून सदर मंजूर आराखडयानुसार विविध विकास योजनांची अंमलबजावणी करण्यात येत आहे.

महापालिका क्षेत्रात निर्माण होणाऱ्या सांडपाण्यावर प्रक्रिया करण्याच्या दृष्टीने प्रमुख ७ नागरी भागांपैकी काही ठिकाणी मलनि:स्सारण केंद्र उभारण्या करीता जागा आवश्यक आहे. मात्र विकास आराखडयातील STP साठी आरक्षीत जागा प्रत्यक्ष कामांकरीता उपलब्ध होत नाहीत. त्यामुळे महापालिका क्षेत्रात विविध प्रयोजनांसाठी आरक्षीत असलेल्या व महापालिकेस प्रत्यक्ष ताबा मिळालेल्या जागांवर STP प्रकल्प उभारणे प्रस्तावित केल्यास विहित कालमर्यादेत निर्माण होणाऱ्या मलजलाची विल्हेवाट लावणे सुलभ होणार आहे.

वसई -विरार उपप्रदेशाच्या विकास आराखडयात दोन ठिकाणी होल्डींग पॉण्ड करीता आरक्षणे असून त्यापैकी एक गाव निळेमोरे येथे एकूण ५,७२,४०० चौ.मी. क्षेत्रफळाच्या जागेवर होल्डींग पॉण्ड आरक्षीत आहे. सदर एकूण आरक्षीत जागेपैकी स.नं.१६२,१६३ स.नं.१/अ/१, १/क/१, १/ब/१ महापालिकेकडे हस्तांतरीत करण्यात आली आहे.

तरी होल्डींग पॉण्ड करीता आरक्षीत असलेल्या व महापालिकेच्या ताब्यात असलेल्या जागा मलनि:स्सारण केंद्र उभारण्याकरीता भौगोलीकदृष्ट्या योग्य असून महापालिकेच्या ताब्यात असलेल्या एकूण ३९४५८१.२३ चौ.मी. जागेपैकी सर्व्हे नं.१६१, १६२ व १६३ पैकी १६०००.०० चौ.मी. जागा नालासोपारा पश्चिम STP Zone-४ करीता उपलब्ध झाल्यास सदर जागेवर STP उभारण्याकरीता काम हाती घेणे शक्य होईल.

महानगरपालिका कार्यक्षेत्रात उर्वरीत निर्माण होणाऱ्या सांडपाण्यावर प्रक्रिया केली जात नसल्याने मा. राष्ट्रीय हरीत लवादाकडे दाखल याचिकेवर दिलेल्या आदेशानुसार महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाने माहे एप्रिल २०१९ पासून रू.०१० प्रती लिटर प्रतिदिन इतका दंड आकारला आहे.

मा.राष्ट्रीय हरीत लवादाच्या आदेशा विरुध्द महापालिकेने Special Leave Application Hon. Apex Court येथे दाखल केले आहे. सदर दाखल अपीलावर मा. सर्वोच्च न्यायालयाने सुनावणी दरम्यान महापालिकेने उर्वरीत भागात मलनि:स्सारण केंद्र उभारण्याचे निर्देश दिले असून राज्य शासनास महापालिकेने सादर केलेल्या झोन-४ व झोन-६ मधील STP प्रकल्पांना मंजूरी देऊन अनुदान उपलब्ध करून देण्याचे निर्देश दिले आहेत.

मा. न्यायालयाने दिलेल्या निर्देशानुसार मा. प्रधान सचिव, नगरविकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांनी महापालिका क्षेत्रातील उर्वरीत भागात मलनि:स्सारण योजना उभारण्याच्या दृष्टीने सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करुन राज्य शासनास प्रस्ताव सादर करण्याच्या सूचना VC व्दारे दिल्या आहेत. तसेच सर्व केलेल्या व करण्यात येणाऱ्या कार्यवाहीबाबत राज्य शासनास दि.०३/०३/२०२५ पुर्वी मा. सर्वोच्च न्यायालयात प्रतिज्ञापत्र सादर करावयाचे आहे.

महापालिकेने प्राधान्यक्रमाने STP Zone-४ व STP Zone-६ चे सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करुन त्यास प्रशासकीय ठराव क्र.२२४३ दि.१०/०२/२०२५ अन्वये प्रशासकीय मान्यता दिली आहे. तसेच सदरचे प्रस्ताव यापुर्वीच दि.२४/०१/२०२५ रोजीच्या पत्रान्वये तांत्रिक मंजूरीकरीता महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडे सादर केले असून राज्य शासनाकडे जागा उपलब्धतेसह प्रस्ताव तातडीने सादर करावयाचा आहे.

तरी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ६६(३१) नुसार वसई-विरार शहर महानगरपालिका क्षेत्रातील नालासोपारा प. भागात निर्माण होणाऱ्या मलजलाची विल्हेवाट लावण्याच्या दृष्टीने मलनि:स्सारण केंद्र उभारण्याकरीता आवश्यक असलेल्या उक्त जागेकरीता महाराष्ट्र प्रादेशीक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ (१) अन्वये आरक्षण बदलाची कार्यवाही प्रस्तावित करावी अशी मागणी पाणिपुरवठा विभाग यांनी केली होती.

वसई विरार उपप्रदेशासाठी वादळपाणी प्रणाली हॉलंडमधील निचरा प्रणालीवर आधारीत आहे. वसई विरार उपप्रदेश येथे काही भाग सखल (low lying) आहे आणि उत्तरेकडे वैतरणा नदी, दक्षिणेकडे भायंदर नदी, पश्चिमेकडे अरबी समुद्र आणि पूर्वेकडे पश्चिम घाट आहेत. त्यामुळे वसई विरार उपप्रदेशा मधील वादळ पाणी तसेच उच्च भरतीच्या काळामध्ये येणाऱ्या पाण्यामुळे व त्या बरोबर मुसळधार पावसाच्या पाण्याचे मोठ्या प्रमाणावर पुर परिस्थीती निर्माण होते व त्यामुळे सदर निचरा प्रणाली ही गुंतागुंतीची आहे.

सदर परिस्थीती आटोक्यात आणण्यासाठी होल्डींग पॉण्ड प्रणाली प्रस्तावित केली गेली होती. जेणेकरुन पावसाचे पाणी व उच्च भरतीचे पाणी वेगळे केले जाऊ शकते. त्याकरीता CIDCO ने सुरुवातीला Holding Pond Design केले आणि त्यानंतर Holding Pond प्रणालीची चाचणी CWPRS ने गणितीय मॉडेलींग करुन केली. त्यामध्ये काही बदल असल्यास ते CWPRS व्दारे निश्चित केल्यानंतरच स्वीकारले जाऊ शकतात.

तरी वसई विरार शहर उपप्रदेशाच्या मंजुर विकास आराखडयामध्ये बदल करणे कामी महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ चे कलम ३७ (१) अन्वये कार्यवाही करणे आवश्यक आहे.

तरी सदर प्रस्तावित मलनि:स्सारण केंद्राचे बांधकाम आरंभ होणे अगोदर CPWRS कडून पुष्टीकरण करणे आवश्यक आहे. सदरची Section ३७ ची कार्यावाही CWPRS कडून पुष्टीकरण मिळणेच्या अटी-शर्तीवर प्रस्तावित करण्यात येत आहे.

तरी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ६६(३१) नुसार वसई-विरार शहर महानगरपालिका क्षेत्रात निर्माण होणाऱ्या मलजलाची विल्हेवाट लावण्याच्या दृष्टीने मलनिस्सारण केंद्र उभारण्याकरीता आवश्यक असलेल्या जागेकरीता होल्डींग पॉण्ड च्या जागे मध्ये मलनिस्सारण केंद्र प्रस्तावित करणे करीता महाराष्ट्र प्रादेशीक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७(१) अन्वये प्रस्ताव सादर करण्यांत येत आहे.

त्यानुसार वसई विरार उपप्रदेशाच्या मंजुर विकास आराखडयामधील होल्डींग पॉन्ड आरक्षणामध्ये प्रस्तावित बदल खालील प्रमाणे.

| | | |
|---|---|---|
| १. | मुळ/ आरक्षण | : होल्डींग पॉन्ड |
| २. | आरक्षणाच्या जमिनीचे तपशिल | : स.नं.१६३ हि.नं.१/अ/१, १/ब/१, १/क/१, २ |
| ३. | बाधीत आरक्षणाचे एकुण क्षेत्रफळ | : १२९००+ २०७०+१२९१०+२८३०=३०७१० |
| ४. | होल्डींग पॉन्ड आरक्षणामधून वगळण्यात येणारे क्षेत्रफळ | : ५७३३.८०+५७३५.८७+५७७०.१९+२७६१.५७=१६००० चौ.मी. |
| ५. | प्रस्तावित आरक्षणाचे तपशिल | : मलनिस्सारण केंद्र (आरक्षण क्र.३५९अ) |
| ६. | प्रस्तावित STP आरक्षणाचे क्षेत्रफळ | : १६००० चौ.मी. अंदाजे |
| ७. | प्रस्तावित STP आरक्षणाचे जमिनीचे तपशिल | : १६३/१A/१, १६३/१/B/१, १६३/१C/१, १६३/२ |

वरील फेरबदलाबाबत महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ (१) नुसार पुढील कार्यवाही करण्यासाठी तसेच सदर आरक्षणाखालील जागा त्या आरक्षणाप्रमाणे विकसित करणेसाठी महानगरपालिकेची प्रशासकीय मान्यता घेणे आवश्यक असल्याने सदरचा प्रस्ताव मा.आयुक्त तथा प्रशासक यांच्यापुढे ठेवण्यांत यावा.

**ठराव/निर्णय :-** वरील प्रस्तावाप्रमाणे वसई विरार उपप्रदेशाच्या मंजूर विकास आराखडयामध्ये खालील काही नविन बाबींचा अंतर्भाव करणे व सध्या असलेल्या आखणीमध्ये बदल करणेस महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ (१) अन्वये कार्यवाही करणेस व याकामी येणा-या खर्चास आर्थिक व प्रशासकीय मान्यता देण्यांत येत आहे. याकामी उक्त अधिनियमातील तरतुदीनुसार पुढील कार्यवाही करणेंत यावी. मंजूर विकास आराखडयामधिल फेरबदल करण्यांत येणा-या आरक्षणाची माहिती खालील प्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १. | मुळ/ आरक्षण | : होल्डींग पॉन्ड |
| २. | आरक्षणाच्या जमिनीचे तपशिल | : स.नं.१६३ हि.नं.१/अ/१, १/ब/१, १/क/१, २ |
| ३. | बाधीत आरक्षणाचे एकुण क्षेत्रफळ | : १२९००+ २०७०+१२९१०+२८३०=३०७१० |
| ४. | होल्डींग पॉन्ड आरक्षणामधून वगळण्यात येणारे क्षेत्रफळ | : ५७३३.८०+५७३५.८७+५७७०.१९+२७६१.५७=१६००० चौ.मी. |
| ५. | प्रस्तावित आरक्षणाचे तपशिल | : मलनिस्सारण केंद्र (आरक्षण क्र.३५९अ) |
| ६. | प्रस्तावित STP आरक्षणाचे क्षेत्रफळ | : १६००० चौ.मी. अंदाजे |
| ७. | प्रस्तावित STP आरक्षणाचे जमिनीचे तपशिल | : १६३/१A/१, १६३/१/B/१, १६३/१C/१, १६३/२ |

१८/०२/२५

आयुक्त तथा प्रशासक
वसई विरार शहर महानगरपालिका